**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वसंत पांडुरंग पाटील
कंथेवाडी, पो.नरसंबळे, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत),
जिल्हा परिषद, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती राधानगरी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४ /कोल्हापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.वसंत पांडुरंग पाटील
कंथेवाडी, पो.नरसंबळे, ता.राधानगरी, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत),
जिल्हा परिषद, कोल्हापूर विद्यमान-श्री.मधुकर विठोबा चौगुले

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती राधानगरी, जि.कोल्हापूर श्री.रामचंद्र केशव जोशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.७.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.८.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.१०.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>कंथेवाडी येथील घर मिळकतीस चुकीचे नाव लागले आहे ते कमी करणे. | |

## विवेचन

आपल्या घर मिळकतीला लावलेले चुकीचे नाव दुरुस्त करुन मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.वसंत पांडुरंग पाटील यांनी केली होती. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे श्री.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१३.५.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

घर मिळकतीला लागलेले चुकीचे नाव कमी करुन मिळण्याबाबत आपण केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागितली होती. जिल्हा परिषदेकडून व पंचायत समितीकडूनही ती मिळाली नाही. ती न दिल्याबद्दल दोषी अधिकाऱ्यांना शास्ती न करता अपिलीय प्राधिकाऱ्यांनी निर्दोष व्यक्तीला शास्ती केली, तसेच मिळालेली माहिती चुकीची आहे, असे प्रतिपादन श्री.पाटील यांनी केले. श्री.पाटील यांना विहित मुदतीत उत्तर दिले होते. आपल्याला हवी असलेली माहिती आपण पंचायत समितीकडून घेतली असल्याचे त्यांनी लेखी दिले. माहिती न दिल्यास कारवाई करण्यात येईल, असे पत्र उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर यांनी दिल्यानंतर श्री.पाटील यांना समक्ष माहिती दिली. त्यावेळी ऊर्वरित माहिती आपण जिल्हा परिषदेकडून घेतली असल्याचे त्यांनी लेखी दिले, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती राधानगरी श्री.रामचंद्र केशव जोशी यांनी केले. श्री.पाटील यांची मूळ मागणी प्रशासकीय कारवाईची आहे. ग्रामपंचायतीने संबंधित नोंद रद्द केलेली आहे. माहिती विहित

मुदतीत न दिल्याच्या कारणावरुन तत्कालीन विस्तार अधिकारी श्री.व्ही.जी.पाटील यांना रु.८२५०/- दंड करण्यात आला असून दि.२३.३.२००७ रोजी ही रक्कम त्यांनी चलनाने भरणा केली आहे. या व्यतिरिक्त श्री.पाटील यांना कोणतीही माहिती हवी असल्यास देण्यात येईल असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.मधुकर विठोबा चौगुले यांनी केले. माहिती मिळाल्याबद्दल श्री.पाटील यांनी दिलेल्या पत्राच्या प्रती त्यांनी सादर केल्या. श्री.पाटील यांना आता हवी असलेली देय माहिती एक आठवड्यात देण्यात येईल, असे गटविकास अधिकारी, पंचायत समिती राधानगरी श्री.रामचंद्र केशव जोशी यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

वस्तुतः माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती करण्याचा अधिकार प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना नाही. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री.व्ही.जी.पाटील यांना अपिलीय प्राधिकाऱ्यांनी लावलेल्या शास्तीचा भरणा त्यांनी केला आहे. ही शास्ती आयोगानेच लावलेली असल्याचे समजून ती कायम करण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

(१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

(२) ऊर्वरित देय माहिती अपीलकर्ता श्री.वसंत पांडुरंग पाटील यांना देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी आयोगाला त्वरित सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गुलाम हसन पठाण
७/२१५, पीएमसी कॉलनी, वाकडेवाडी, पुणे-मुंबई मार्ग, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, हवेली, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५१+१२६२+१२६३/पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.७.२००८(वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गुलाम हसन पठाण
७/२१५, पीएमसी कॉलनी, वाकडेवाडी, पुणे-मुंबई रोड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हवेली, जि.पुणे श्री.संजीव देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय, हवेली, जि.पुणे श्री.संदेश शिर्के

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.२.२००७, ११.१२.२००६, १३.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.३.२००७,८.१.२००७, |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.४.२००७,२३.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.४.२००७, |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>खराडी येथील स.नं.१ व संबंधित ११, माहे मे सन १९५९ मधील मामलेदार, ता.हवेली यांनी कुळाचे नाव कमी केलेल्या ल.टे.खा.नं.६/५८ चा ३०.३.५९ चा फेरफार ७१४ कुळाचे नाव कमी केले, फाईलच्या छायांकित प्रती. सन १९०० ते १९७३ पर्यंतचे सर्व फेरफार व सनद मिळावी. स.नं.१ हिस्सा नं.१ या शेताचे फेरफार नं.६९०:५९४/३३५/७४४/६१४/८६५ कसे पडले त्याचा तपशील. | |

## विवेचन

मौजे खराडी, ता.हवेली, जि.पुणे येथील शेतजमिनीचे ७/१२, फेरफार, सनद आदींच्या सन १९३० ते १९५३ पर्यंतच्या प्रतींची मागणी वारंवार करुनही पूर्ण माहिती दिली जात नाही, म्हणून अपीलकर्ता श्री.गुलाम हसन पठाण यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले केली आहेत.

दि.१६.७.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलांची सुनावणी घेण्यात आली.

दोन वर्षांचा कालावधी उलटून गेला तरी आरटीएस फाईल, कूळ कायद्याची फाईल व क,ड,ई पत्रक ही माहिती आपल्याला मिळत नाही, अशी तक्रार श्री.पठाण यांनी केली. श्री.पठाण यांना संबंधित मूळ संचिका आढळत नसल्याचे वेळीच कळविण्यात आले होते, तसेच स्वत: अभिलेख तपासणी करण्याची मागणी केल्यानुसार त्यांना दोनदा तपासणी करु देण्यात आली. त्यात कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे आवश्यक ते सहकार्य दिले गेले, परंतु सन १९३० पासूनची माहिती

मागितली असून ती उपलब्ध नसल्यामुळे देता आली नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.संदेश शिर्के यांनी केले.श्री.पठाण यांनी लोकशाही दिनामध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडे याच स्वरुपाची मागणी केली होती. त्यानुसार अभिलेखात शोध घेऊन आढळलेल्या प्रती त्यांना देण्यात आल्या होत्या व अन्य कागदपत्रे आढळत नसल्याचे त्यांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि.१५.१२.२००७ व दि.२४.१२.२००७ च्या निवेदनाद्वारे नमूद केले आहे.

अपीलकर्त्यासह अभिलेख कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने संबंधित कागदपत्रांचा शोध घेऊन १५ दिवसांत अहवाल सादर करावा, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार श्री.पठाण यांना अभिलेखाचे अवलोकन करु देण्यात आले. परंतु आपल्याला कागदपत्रे मिळाली नाहीत, आपण शोध घेण्यासाठी गेलो की संबंधित अभिलेख बाजूला काढून ठेवले जातात, अशी तक्रार श्री.पठाण यांनी दि.४.८.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. त्यावर आयोगाने दि.२९.८.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा खुलासा मागविला. दरम्यानच्या काळात संबंधित अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या. मात्र अभिलेखाचा शोध श्री.पठाण यांना घेऊ देण्यात आला होता. तसेच कर्मचाऱ्यांमार्फतही याबाबत शोध घेण्यात येत आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी निवेदन केले. श्री.पठाण यांना अभिलेखामधील सर्व दस्तऐवज पाहण्यासाठी दिलेले होते. त्यांनी स्वतः पाहणी करुन उपलब्ध झालेल्या कागदपत्रांच्या त्यांना देण्यात आल्या आहेत. त्यांच्या तक्रारीत तथ्य नाही, असा अहवाल जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हवेली श्री.संदेश शिर्के यांनी दि.१७.९.२००८ च्या पत्रान्वये सादर केला आहे.

वरील बाबी लक्षात घेता जतनाच्या कालावधीनुसार कागदपत्रे जतन करण्यात आली नसल्याचे दिसून येते. मात्र सुमारे ७७ वर्षांपूर्वीपासूनची कागदपत्र मागितली असल्यामुळे ती प्राप्त न होण्यास विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना जबाबदार धरता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपीले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) संबंधित अभिलेखाचा शोध घेण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा व सद्यस्थितीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हवेली, जि.पुणे यांनी दि.२०.९.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा व त्याची प्रत अपीलकर्त्यास द्यावी.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१ .८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १०८०/ पुणे | श्री.श्रीधर लक्ष्मण तापकिर चऱ्होली बु.गा. चोवीसावाडी, ता.हवेली, जि.पुणे | निवासी नायब तहसीलदार, हवेली, जि.पुणे | तहसीलदार, हवेली, जि.पुणे | सन १९३० ते १९५० व १९८४ ते १९९० पर्यंतचे ७/१२ उतारे व फेरफार क्र.७०७, ८७३४ व स.नं.१३३ व १३४/४ संबंधी | जन माहिती अधिकारी यांनी दि.१९.०७.२००८ रोजी अपीलकर्त्यास हवे असणारे अभिलेख (उदा. फेरफार पुस्तक व व क ,ड , ई पत्रकावरील फेरफार विषयी कागदपत्रे) उपलब्ध करुन दिले होते. त्याप्रमाणे आढळ झालेल्या अद्ययावत कागदपत्रांच्या नकलांची कार्यालयाच्या विहित नियमावलीनुसार मागणी करणे आवश्यक आहे. |
| २ | २३६१/ पुणे | श्री.विठ्ठल भगवान लोकरे ई-१, गोखले इन्स्टीट्यूट, स्टाफ क्वार्टर्स, ८३२ ब, शिवाजीनगर, | जन माहिती अधिकारी, गोखले राज्यशास्त्र अर्थशास्त्र संस्था, पुणे-४ | अपिलीय प्राधिकारी, गोखले राज्यशास्त्र, अर्थशास्त्र संस्था, पुणे-४ | गोखले अर्थशास्त्र संस्थेत असणाऱ्या कृषी अर्थशास्त्र संशोधन केंद्र, लोकसंख्या संशोधन केंद्र रिझर्व बँक ऑफ इंडिया यामध्ये विविध | मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ अन्वये स्वयंस्फूर्तीने जाहीर करण्याची आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पुणे-४ | | | पदावर काम करणारे अधिकाऱ्यांचे वेतन भत्ते इ. संदर्भात माहिती | मात्र भाष्य, अन्वयार्थ या स्वरुपाचा अहवाल अपीलकर्त्यास मागता येणार नाही. केंद्र सरकारला संस्थेने सादर केलेल्या वेतन व भत्ते पत्रकाच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आठ दिवसात द्याव्या. |
| ३ | ३१३२/ पुणे | श्री.राजेंद्र बळवंत साळुंके इंदिरा प्लॉट नं.२, सेरियल नं.२, प्रतिभानगर, धनकवडी, पुणे-४२ | प्राचार्य, अभिनव एज्युकेशन सोसायटीचे लॉ कॉलेज, आंबेगाव बु.।., जि.पुणे | सचिव, अभिनव एज्युकेशन सोसायटीचे लॉ कॉलेज, आंबेगाव बु.।., जि.पुणे | श्रीमती विद्या विश्वास जाचक किंवा श्रीमती विद्या दिलीप साळुंके यांचे संबंधी उदा. प्रवेश अर्ज, फी, हजेरी टायमिंग इ.संबंधीची माहिती | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१) वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ३ (अपील क्र. १०८०/पुणे, २३६१/पुणे व ३१३२/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्रमांक २३६१/पुणे प्रकरणी निष्कर्षात नमूद / आदेशित केल्यानुसार पूर्तता करुन अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १८-०८-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. मोहिनीराज ओंकार,
सहसंघटक,
ग्राहक सदन, ६३४, सदाशिव पेठ, फडतरे चौक, पुणे-३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, उत्तरवादी
पुणे महाागरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०८४ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, पुणे सौ. हर्षदा वि.शिंदे

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे तर्फे प्रतिनिधी श्री. प्रवीण गेडाम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.४.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

**८ <u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**

पुणे महानगरपालिकेमध्ये सार्वजनिक उपयोगासाठी आरक्षित केलेल्या व संपादित झालेल्या जागांना दिलेली नुकसानभरपाईची रक्कम परत घेऊन त्या बदल्यात टी.डी.आर. देण्याची पध्दत केव्हापासून सुरु झाली, टी.डी.आर. प्रस्तावांची छाननी करून मंजूर करण्यासाठीची कार्यप्रणाली व पुणे महानगरपालिकेच्या अधिका-यांची समिती गठीत केली होती का, असल्यास त्या ठरावाची नक्कल, तसेच आयुक्तांकडील ठराव क्र.२०९ दि.१७.६.१९९६ ची प्रत व इतर अनुषंगिक माहिती

## विवेचन

पुणे महानगरपालिकेमध्ये सार्वजनिक उपयोगाकरिता टी.डी.आर. देण्याची पध्दत केव्हापासून सुरू झाली, ही व त्या अनुषंगाने ठराव आदींची माहिती अपीलकर्ता श्री. मोहिनीराज ओंकार यांनी मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने श्री. ओंकार यांनी अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे अपील केले. परंतु अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याची दखल न घेतल्याचे नमूद करून श्री. ओंकार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

'पुणे शहरात अवैधरीत्या व कायद्याने घालून दिलेल्या नियमांचे पालन न करता पुणे महानगरपालिकने गेल्या दहा वर्षात अनुज्ञेय केलेल्या टी.डी.आर. संबंधीचा हा विषय आहे. महानगरपालिकेच्या या बेकायदेशीर कृतीमुळे महानगरपालिकेचे बेकायदेशीर बांधकामावर नियंत्रण रहाणार नाही व अशा बांधकामांमुळे सामान्य नागरिकांना नाहक त्रास भोगावा लागणार आहे. या सर्व कृतीस कुठे तरी पायबंद बसला पाहिजे व असे नियमबाह्य बांधकामास परवानगी देण्याच्या सर्व संबंधितांचे उत्तरदायित्व निश्चित होणे व त्यांचेविरूध्द योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे.' पुणे महानगरपालिकेचे बांधकाम नियंत्रण नियमावलीस - ज्यात टी.डी.आर. देण्याची तरतूद आहे - शासन मान्यता १९९७ साली मिळाली आहे. मात्र महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांनी या नियमांची अंमलबजावणी अशी शासनमान्यता मिळण्यापूर्वीच सुरू केली व तीही कोणतेही अधिकार नसताना, ही अत्यंत आक्षेपार्ह व गंभीर बाब आहे,' असे श्री. ओंकार यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. आपण वारंवार संपर्क साधूनही ठरावाची प्रत आपल्याला मिळाली नाही. नगर सचिव कार्यालयाकडून या ठरावाची प्रत मागितली असली तरी ठराव आयुक्तांचा असल्याने त्याची प्रत नगर सचिवांकडे असण्याची शक्यता नाही. संबंधित खात्याकडे किंवा आयुक्तांकडे ती असणे आवश्यक आहे, असेही श्री.ओंकार यांनी निवेदनात म्हटले आहे.

जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तरात वस्तुनिष्ठ माहिती देण्यात आली आहे. श्री. ओंकार यांनी आयुक्त ठराव क्र.२०९ दि. १७.६.१९९६ ची प्रत मागितली आहे. ती प्राप्त झाल्यावर उपलब्ध करून देण्यात येईल, असे उत्तर जन माहिती अधिकाऱ्यांनी दिले होते. परंतु हा ठराव झालेलाच नसल्याचे

आढळते, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले.

श्री. ओंकार यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलानंतर आयोगाकडून प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने दि. ३१.१२.२००७ रोजी श्री. ओंकार यांना माहिती देण्यात आली, तसेच सुनावणीत आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार श्री. ओंकार यांच्याशी दि. २५.८.२००८ रोजी आपण दूरध्वनीवरून संपर्क साधला व या संदर्भात आणखी काही माहिती हवी असल्यास व पुणे महानगरपालिकेकडे संपर्क साधल्यास त्वरित देण्यात येईल, असे त्याना कळविले. आपण चार दिवसांत पुणे महानगरपालिकेशी समक्ष संपर्क साधू, असे श्री. ओंकार यांनी सांगितले. त्यानुसार आवश्यक ती अन्य माहितीही त्यांना दिली जाईल, असे अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांचे प्रतिनिधी श्री. प्रवीण गेडाम यांनी दि. २६.८.२००८ रोजीच्या निवेदनाद्वारे आयोगाला कळविले आहे.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे पहाता जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत उत्तर दिले आहे. मात्र माहितीबाबत नेमकेपणा व ती देण्याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अपेक्षित असलेली पारदर्शकता यापेक्षा तांत्रिकतेवर भर असल्याचे स्पष्ट दिसते. प्रथम अपिलाची दखल न घेणे ही गंभीर बाब असून तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका श्री. प्रशांत वाघमारे, नगर अभियंता, पुणे महानगरपालिका यांना याबाबत समज देण्यात येत आहे.

श्री. ओंकार यांनी निवेदनात माहिती मागण्याबाबत नमूद केलेली भूमिका चिंतनीय असली तरी प्रशासकीय कार्यवाहीशी निगडीत आहे, व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत उपाययोजना करण्याजोगी नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २४ .८.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
टेक्निकल हौसिंग सोसायटी, फ्लॅट नं.१४, ए वॉर्ड,
वाशी रोड, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हातकणंगले,
तहसीलदार कार्यालय हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले,
तहसीलदार कार्यालय हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९ / कोल्हापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ९.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सदाशिव दत्तात्रय निकम
टेक्निकल हौसिंग सोसायटी, फ्लॅट नं.१४, ए वॉर्ड, वाशी रोड, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, हातकणंगले,
तहसीलदार कार्यालय हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर
विद्यमान श्री.सतीश बागल, तत्कालीन-श्री.सुभाष मच्छिंद्र भागडे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले,
तहसीलदार कार्यालय हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर श्री.रणजीत पांडुरंग देसाई

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.६.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.८.२००६ |
| ८ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br><br>जुलै २००५ च्या पूरग्रस्तांना दिलेले सानुग्रह अनुदान-मौजे पारगाव(जुने)ता.हातकणंगले या गावातील पूरग्रस्तांना प्रतिव्यक्ती सानुग्रह अनुदान दोन टप्प्यात देण्यात आले, नमुन्यादाखल २२ कुटुंबांची यादी जोडली आह. या कुटुंबांच्या पंचनाम्याची साक्षांकित प्रत, यांची घरे पूररेषेच्या आत आहेत की नाहीत व त्यासंबंधी पूररेषा दर्शविणाऱ्या नकाशाची साक्षांकीत प्रत, अनुदानासाठी रेशनकार्ड हा निकष आहे, त्याप्रमाणे वाटप केले असल्यास यादीतील अ.क्र.११ ते २२ मधील कुटुंबप्रमुखांची नावे रेशनकार्ड असल्याबाबत त्यांच्या रजिस्टर नोंदीची साक्षांकित प्रत, या वाटपासाठी गठित केलेल्या समितीतील सर्व अधिकाऱ्यांचे पूर्ण नाव, पद आणि ते ज्या आदेशाने रुजू झाले त्याची साक्षांकित प्रत. | |

## <u>विवेचन</u>

मौजे पारगाव (जुने), ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर या गावातील जुलै २००५ मध्ये झालेल्या पुरातील ग्रस्त व्यक्तींना दिलेल्या सानुग्रह अनुदानाच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.सदाशिव दत्तात्रय निकम यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले यांच्याकडे माहिती मागितली होती. 'आपदग्रस्त नसताना सानुग्रह अनुदानाच्या वाटपातील भ्रष्टाचार' असे नमूद करुन श्री.निकम यांनी २२ व्यक्तींची 'नमुन्यादाखल यादी' म्हणून सोबत जोडली होती. त्यातील तीन व्यक्तींबाबतची माहिती मिळाली नाही. माहिती देण्यात कसून केली व दिशाभूल केली, म्हणून जन माहिती अधिकाऱ्यांना कडक शास्ती व्हावी, अशा मागणीसाठी श्री.निकम यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, हातकणंगले यांच्याकडे अपील केले. 'अपिलकारांना मुद्दा क्र.अ मधील आपदग्रस्तांचे नुकसानीबाबतचे पंचनामे दिलेची माझी खात्री झ ाल्याने मुद्दा क्र.अ मधील आक्षेप फेटाळण्यात येत आहे. अपिलकाराने सुनावणीच्या वेळी पूररेषेबाबतचा नकाशा पाटबंधारे खात्याकडून घेतल्याचे मला दाखविले आहे. अपिलकारास ज्या त्या अधिकाऱ्यांकडून माहिती घेणे आवश्यक असल्याची जाणीव असता व सदरची माहिती त्यांच्याकडे यापूर्वीच प्राप्त झाली असल्यामुळे माहिती मागण्याबाबतचा हेतू प्रामाणिक नसल्याचे

दिसून येत असल्यामुळे, आक्षेप क्र.ब फेटाळीत आहे. मुद्दा क्र.क बाबत ज्या शिधापत्रिकेचा क्रमांक नमूद करण्यात आला आहे तो अपिलकाराला दिलेला आहे. अन्य शिधापत्रिकाधारकांचे क्रमांक नोंदवहीत नमूद नसल्याने ते अपिलकार यांना पुरविणे शक्य नव्हते, हा उत्तरवादी यांचा युक्तिवाद मान्य करण्यात येत आहे. मुद्दा क्र.ड बाबत सानुग्रह अनुदान वाटपासाठी गठित केलेल्या समितीमधील सदस्यांची नांवे मागितली आहेत, परंतु त्यासाठी कोणतीही समिती गठित केली नसल्यामुळे माहिती देता येणार नाही. मात्र तलाठी व मंडल अधिकारी यांच्या नियुक्तीचे आदेश यापूर्वीच उत्तरवादी यांनी दिलेले असलेने मुद्दा क्र.५ बाबत उत्तरवादी यांनी कोणतीही कसूर केली नसल्याची माझी खात्री झाल्याने व अपिलदार यांची तक्रार वस्तुनिष्ठ नसल्याने कलम २० अन्वये शास्तीची मागणी विधीसंमत नाही,' असा निष्कर्ष नोंदवून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील फेटाळले.

माहिती देण्यात कसूर आणि दिशाभूल, घटनेच्या अनुच्छेद-१४ चा भंग आणि अनुच्छेद-२१ अन्वये वित्तहानी झाली आहे, म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये शास्ती व शिस्तभंगाची कार्यवाही व्हावी व विलंबाचा कायदा २००६ कलम १० अन्वये कारवाई व्हावी, अशा मागणीसाठी श्री.निकम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१३.५.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. आपल्या कार्यालयाकडील माहिती देण्यात आली आहे. अन्य खात्याकडील माहितीबाबत अर्ज त्या कार्यालयाकडे वर्ग करणे आवश्यक होते, परंतु त्यावेळी कायदा नवा असल्यामुळे तरतुदीची पूर्ण कल्पना नसल्याने चूक झाली, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, हातकणंगले यांनी प्रपत्रात नमूद केले, तर अपीलकर्त्याने सुनावणीची मागणी नोंदविली. उभय घटकांत एकमत न झाल्याने अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

आपल्याला संपूर्ण माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन श्री.निकम यांनी केले. श्री.निकम यांचा अर्ज दि.६.६.२००६ रोजी प्राप्त झाला. माहिती तयार असून शुल्क भरण्याबाबतचे पत्र त्यांना

दि.१५.६.२००६ रोजी देण्यात आले दि.१.७.२००६ रोजी त्यांनी चलनाने पैसे भरुन माहिती घेतली. श्री.निकम यांनी अर्ज केला त्या काळात (जून २००६) तालुक्यातील पूरपरिस्थितीला तोंड देण्याबाबत उपाययोजनांची तयारी सुरु होती. पूरामध्ये केलेल्या पंचनाम्यांची संख्या सुमारे ५०,००० च्या वर होती. त्यांनी दिलेल्या यादीतील १९ पंचनामे माहितीसोबत दिले, तीन पंचनामे चौकशीकामी उपविभागीय अधिकारी कार्यालयात दाखल केलेले असल्यामुळे आपल्या अभिलेखात उपलब्ध नव्हते. नंतर ते प्राप्त होताच प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी समक्ष देण्यात आले, असे जन माहिती अधिकारी श्री.रणजीत देसाई यांनी लेखी व तोंडी नमूद केले. अनुदान वाटपाच्या संदर्भातील तक्रारीबाबत चौकशी होऊन उपजिल्हाधिकाऱ्यांनी अहवाल दिलेला आहे, त्यामध्ये संबंधित मंडल अधिकारी व तलाठी यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले. अपीलकर्त्याला आवश्यक असल्यास या चौकशी अहवालाची प्रत देण्याचे मौखिक आदेश आयोगाने दिले.

तीन व्यक्तींबाबतचे पंचनामे वगळता अपीलकर्त्याला सर्व माहिती विहित मुदतीत देण्यात आली आहे. तीन पंचनामे देण्यास झालेल्या विलंबाबाबतचे जन माहिती अधिकाऱ्यांनी केलेले स्पष्टीकरण योग्य आहे. जन माहिती अधिकारी यांनी नमूद केलेली परिस्थिती अपीलकर्त्याने समजून घेणे आवश्यक होते. हे लक्षात घेता शास्तीची व नुकसानभरपाईची मागणी अमान्य करण्यात येत आहे. घटनेच्या कलमांचा भंग, विलंबाचा कायदा (बहुधा अपीलकर्त्याला दप्तर दिरंगाईचा कायदा अपेक्षित असावा.) आदि विषयांबाबतच्या कारवाईची मागणी अतिशयोक्त असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १४.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश दिनकरराव गायकवाड
१३२५/२७, शिवाजी उद्यमनगर, जिल्हा कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२ /कोल्हापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश दिनकरराव गायकवाड
१३२५/२७, शिवाजी उद्यमनगर, जिल्हा कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.जे.एन.कांबळे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर विद्यमान श्री.जे.एन.कांबळे
तत्कालीन श्री.ए.एस.कांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.११.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सन २००६ मध्ये शहर गॅस एजन्सीकडून ग्राहकांना दिलेल्या सूचना व नियमांबाबत चोवीस मुद्दयांवरील माहिती. | |

## विवेचन

घरगुती वापराच्या गॅसच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.सुरेश दिनकरराव गायकवाड यांनी चोवीस मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित गॅस कंपनीच्या विक्रीकर अधिकाऱ्यांकडून माहिती मागण्यास सांगणारे उत्तर दिले. त्याविरुध्द श्री.गायकवाड यांनी केलेले अपील अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी फेटाळले. आपल्याला माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.गायकवाड यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१३.५.२००८ रोजी आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. संबंधित अधिकाऱ्यांनी चालविलेली गॅस ग्राहकांची फसवणूक व गॅसचा काळाबाजार उजेडात येऊ नये म्हणून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मागणीची दखल घेतली नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन श्री.गायकवाड यांनी केले. गॅस कंपनीकडून होणारा पुरवठा अथवा त्यांचे व्यवहार हा विषय जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कक्षेत येत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.पी.एस.आवटे व तत्कालीन अपिलीय प्राधिकारी श्री.डी.के.शिंदे यांनी केले. परंतु हा विषय जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याच कक्षेतील

असल्याचे मत श्री.गायकवाड यांनी मांडले. संबंधित गॅस कंपनीचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपीलकर्ता माहिती घेऊ शकतात, त्यांना विचारलेल्या मुद्दयाची माहिती देण्याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.ए.एस.कांबळे व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.जे.एन.कांबळे आणि अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी एक आठवड्यात कार्यवाही करुन आयोगाला अहवाल सादर करावा, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्याप्रमाणे हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनी, भारत पेट्रोलियम कंपनी, इंडियन ऑईल कंपनी या कंपन्यांच्या कोल्हापूर येथील विक्री अधिकाऱ्यांना कळविण्यात आले असून हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनी, भारत पेट्रोलियम कंपनी या दोन कंपन्यांनी आपल्या जन माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती मागण्यास कळविल्याचे व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांना व अपीलकर्त्यास आपण कळविले असल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.जे.एस.कांबळे यांनी आयोगास अवगत केले आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रभारी सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.ए.एस.कांबळे यांनी आपण आता निवृत्त झालो असल्याचे नमूद करुन संबंधित अर्जावर त्यावेळी केलेल्या कार्यवाहीचा तपशील सादर केला. तसेच आयोगाच्या मौखिक आदेशानुसार अपीलकर्ता यांना आपल्या कार्यालयाकडील व गॅस कंपन्यांकडून मागविलेली माहिती वेळोवेळी पुरविण्यात आल्याचे माहितीच्या प्रतींसह जिल्हा पुरवठा अधिकारी, कोल्हापूर यांनी दि.१३.८.२००९ रोजीच्या अहवालान्वये आयोगास अवगत केले आहे.

गॅस कंपनीकडील माहिती त्या त्या सार्वजनिक प्राधिकरणाकडूनच अपीलकर्त्याने मागणे आवश्यक आहे. मात्र 'गॅस घरपोच घेण्याबाबत कोणता आदेश झाला', 'सध्या काळ्या बाजारात विकला जाणारा गॅस कोठून येतो', वेळोवेळी गॅस टाकीचा वायसर खराब झाल्यास, वायसर व रेग्युलेटर दुरुस्ती करण्याची सुविधा कोठे आहे', अशा स्वरुपाचे प्रश्न श्री.गायकवाड यांनी विचारले असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत ते 'माहिती' या सदरी येत नाहीत, किंबहुना 'माहिती' म्हणून अशी विचारणा करणे हा या कायद्याचा योग्य वापर नाही, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२४.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :

| अ.क्र | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | ११२२ +१७३३+ १७९९+१८४४+ २०६१ व २०६२/ पुणे | श्री. आलम अमिन तांबोळी रा. आळंदी (देवाची), ता.खेड, जि.पुणे | मुख्याधिकारी नगर परिषद आळंदी (देवाची), ता.खेड, जि.पुणे | उप आयुक्त (सामान्य प्रशासन), पुणे विभाग, पुणे |

| अपील क्र. | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|
| ११२२ / पुणे | दि. १९.७.२००६ रोजी पाण्याच्या टाकीजवळील लिलावात बोली करणाऱ्या व गाळे घेतलेल्या लोकांची यादी व काही लोकांनी बोली बोलून चेक देऊनसुध्दा गाळे घेतले नाहीत, त्यावर काय कार्यवाही केली. नगर परिषदेचे वार्षिक उत्पन्न, यावर्षी मंजूर कामाचा तपशील, विना परवाना बांधकाम अशा ५ मुद्दयांची माहिती | विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सर्व माहिती दिली आहे. माहिती प्राप्त झाल्याबाबत अपीलकर्त्याने स्वाक्षरीने पोहच दिली आहे. |
| १७३३/ पुणे | बांधकामाबाबत, गटाराबाबत, मिनी शॉपिंग सेंटर व्यवसाय इ.बाबतची माहिती | विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सर्व माहिती दिली आहे. माहिती प्राप्त झाल्याबाबत अपीलकर्त्याने स्वाक्षरीने पोहच दिली आहे. |
| १७९९/ पुणे | कोर्टात केस नं. ९६/०६ असताना संरक्षण भिंत पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने पाडण्यात आली आहे या अनुषंगाने एकूण ०७ मुद्दयांची माहिती | विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सर्व माहिती दिली आहे. माहिती प्राप्त झाल्याबाबत अपीलकर्त्याने स्वाक्षरीने पोहच दिली आहे. |
| १८४४/ पुणे | सन २००६ ते २००७ या कालावधीत गर्व्हमेंट कॉन्ट्रक्टर, अंतर्गत रस्ते व इतर बाबत एकूण ३ मुद्दयांची माहिती | विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सर्व माहिती दिली आहे. माहिती प्राप्त झाल्याबाबत अपीलकर्त्याने स्वाक्षरीने पोहच दिली आहे. |

| | | |
|---|---|---|
| २०६१/ पुणे | दि. १२.२.२००८ रोजी संरक्षण भिंत बांधण्यासाठी परवानगी मागितली असता पुरावा सादर करण्याबाबत कळविण्यात आले या अनुषंगाने किती लोकांना अशा प्रकारे परवानगी दिली त्यांची यादी, सन २००२ ते २००८ या कालावधीतील प्राथमिक शाळा क्र.४ समोरील बांधकामाच्या अनुषंगाने माहिती | विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सर्व माहिती दिली आहे. माहिती प्राप्त झाल्याबाबत अपीलकर्त्याने स्वाक्षरीने पोहच दिली आहे. |
| २०६२ / पुणे | जिल्हाधिकाऱ्यांनी मागविलेला अहवाल, नळ कनेक्शन व बंद गटाराच्या अनुषंगाने एकूण ३ मुद्दयांची माहिती | विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सर्व माहिती दिली आहे. माहिती प्राप्त झाल्याबाबत अपीलकर्त्याने स्वाक्षरीने पोहच दिली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील एकूण ६ अपिले अनुक्रमांक १ ते ६ ( अपील क्र. ११२२, १७३३, १७९९, १८४४, २०६१ व २०६२/ पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद श्री. संजीव ओहोळ (सध्या मुख्याधिकारी, बुलढाणा नगरपरिषद, जि. बुलढाणा ) यांनी अपीलकर्त्यास विहित वेळेत व मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करून न देता केलेल्या कसुरीबद्दल त्यांच्याविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्तीसह अन्य कारवाई का करू नये, याबाबतचा खुलासा दि. २५.९.२००९ पर्यंत आयोगास सादर करावा.

**पुणे**

**दि. ३.८.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विजयकुमार वसंत सोनावणे
उत्तम एनक्लेव्ह, बी-१, फ्लॅट नं.१६, औंध गाव, पुणे-७ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सल्लगार (कामगार),
पुणे महानगरपालिका — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार कल्याण अधिकारी,
पुणे महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२६ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.७.२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विजयकुमार वसंत सोनावणे
उत्तम एनक्लेव्ह, बी-१, फ्लॅट नं.१६, औंध गाव, पुणे-७

**अपिलीय प्राधिकारी** तथा सल्लगार (कामगार),
पुणे महानगरपालिका श्री.नंदकिशोर जगताप

**जन माहिती अधिकारी** तथा कामगार कल्याण अधिकारी,
पुणे महानगरपालिका श्री.शिवाजी दौंडकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.९.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>पुणे महानगरपालिकेने कामगार प्रशिक्षण सहल काढली होती. त्या सहलीमध्ये प्रशिक्षण वर्गाचे शिक्षक श्री.विजय सोनवणे, श्री.मधुकर बिबवे, श्रीमती राहिणी आंबवणे यांना विद्यार्थ्यांबरोबर एकत्रितरित्या सहल, प्रवास सुखरुप पार पाडण्याची जबाबदारी न पाळल्याबद्दल तिन्हीही शिक्षकांवर खातेनिहाय चौकशी नियुक्त केली, सदर दोषारोपाबाबतच्या प्रती मिळणेबाबत. | |

## विवेचन

खातेनिहाय चौकशी सुरु केलेल्या कामगार शिक्षकांवरील दोषारोपपत्रांच्या प्रती अपीलकर्ता श्री.विजयकुमार वसंत सोनावणे यांनी विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे मागितल्या होत्या. विभागीय आयुक्त कार्यालयाने हा अर्ज सल्लागार (कामगार) कार्यालय, पुणे महानगरपालिका यांच्याकडे वर्ग केला. जन माहिती अधिकारी तथा कामगार कल्याण अधिकारी, पुणे महानगरपालिका यांनी पूर्ण माहिती दिली नाही, अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून श्री.सोनावणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. विजयकुमार वसंत सोनावणे, श्री.मधुकर बिबवे, श्रीमती राहिणी आंबवणे या तीन कामगार शिक्षकांनी कामगार प्रशिक्षणांतर्गत आयोजित केलेल्या शैक्षणिक सहलीमध्ये गैरवर्तन केल्याच्या तक्रारीवरुन त्यांची खातेनिहाय चौकशी सुरु आहे. श्री.बिबवे व श्रीमती आंबवणे यांच्यावरील दोषारोपपत्रांच्या प्रतींची मागणी श्री.सोनावणे यांनी केली होती. परंतु चौकशी सुरु असल्यामुळे तपासावर विपरित परिणाम होऊ नये, म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम ८(ज) नुसार ही मागणी जन माहिती अधिकाऱ्यांनी नाकारली व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ती ग्राह्य मानली. बारापैकी दहा मुद्दयांची माहिती मिळाली असून दोन मुद्दयांची मिळाली नाही, असे प्रतिपादन श्री.सोनावणे यांनी केले. अद्याप तपास पूर्ण झालेला नसल्याने ही माहिती दिली नसल्याचे

जन माहिती अधिकारी श्री.शिवाजी दौंडकर यांनी नमूद केले. तीनही शिक्षकांबाबत एकच आरोप असल्यामुळे दोषारोपपत्रांच्या प्रती देण्याने चौकशीच्या कामकाजावर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे, हे जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेले कारण योग्य नाही, त्यामुळे प्रती द्याव्या, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार दि.१९.७.२००८ रोजी दोषारोपपत्राच्या छायांकित प्रती श्री.सोनावणे यांना पाठविल्याचा अहवाल अपिलीय प्राधिकारी श्री.नंदकिशोर जगताप यांनी दि.३०.८.२००८ रोजी आयोगाला सादर केला.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

पुणे
दि.३१.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय मुरग्याप्पा शेणगावे — अपीलकर्ता
मु.पो.बहिरेवाडी, ता.आजरा, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, श्री भैरवनाथ
शिक्षण प्रसारक मंडळ, बहिरेवाडी, ता.आजरा, जि.कोल्हापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, भैरवनाथ हायस्कूल,
बहिरेवाडी, ता.आजरा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४ /कोल्हा/ २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ,
बहिरेवाडी, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.अनिल दत्तात्रय आजगेकर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, भैरवनाथ हायस्कूल,
बहिरेवाडी, ता.आजरा, जि.कोल्हापूर श्री.सदाशिव मल्लय्या स्वामी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.९.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

| | |
|---|---|
| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, बहिरेवाडी, ता.आजरा, जि.कोल्हापूर या संस्थेची व भैरवनाथ हायस्कूल बहिरेवाडी, ता.आजरा या कार्यालयाकडील<br>१.सध्या कार्यरत असलेले संस्थेचे अधिकृत संचालक मंडळ व पदाधिकारी यादी, मार्च,२००६ अखेर, तसेच संस्थेच्या सभासदांची यादी. २.भैरवनाथ हायस्कूलकडे सन २००२ ते २००६ अखेर हजर झालेल्या / नविन नियुक्त केलेल्या शिक्षकण शिक्षणसेवक, शिक्षकेतर कर्मचारी आदेशाची प्रत व शालेय समिती ठराव प्रत. ३.मुख्याध्यापक किरकोळे आजारी, दिर्घ मुदत, हक्काच्या किंवा संस्थेकडील इतर कर्मचारी दिर्घ मुदतीच्या रजेवर गेले असल्याची अर्जाची प्रत व सदरचा अर्ज मंजूर केल्याची संचालक मंडळ अगर शालेय समिती ठराव प्रत. ४.सध्या कार्यरत असलेल्या मुख्याध्यापक यांना मुख्याध्यापक पदी बढती दिलेल्या आदेशाची व संस्था ठरावाची प्रत. ५.शासकडून सर्व शिक्षण अभियान अंतर्गत अनुदानाची मिळालेली रक्कम, काढलेली रक्कम, कोणत्या तारखेला काढली, चेक नंबर, काढण्याचा अधिकार कोणाला आहे, कोणाच्या सहीने सन २००६ अखेरपर्यंत काढली. ६.संस्थेकडील कर्मचारी वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणीसाठी शिक्षण खाते, कोल्हापूर यांच्याकडे पाठविलेल्या प्रस्तावाची व ठरावाची प्रत. संस्थेकडील सध्या कार्यरत असलेली शालेय समिती साक्षांकित प्रत. |

## विवेचन

श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, बहिरेवाडी, ता.आजरा, जि.कोल्हापूर या संस्थेचे संचालक मंडळ व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या संदर्भात आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री भैरवनाथ हायस्कूल, बहिरेवाडी, ता.आजरा, जि.कोल्हापूर व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, बहिरेवाडी, ता.आजरा, जि.कोल्हापूर यांच्याकडून न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.संजय मुरग्याप्पा शेणगावे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्रधिकारी हे गैरहजर होते, त्यामुळे सदर अपील सुनावणीसाठी घेण्यात आले. सुनावणीलाही अपीलकर्ता गैरहजर होते.

आपल्याकडील उपलब्ध माहिती श्री.शेणगावे यांना दिलेली आहे. संस्थेत अंतर्गत वाद असल्यामुळे अध्यक्ष, सचिव असल्याचे दोन दोन व्यक्तींचे दावे आहेत. या संदर्भातील वाद सह-धर्मादाय आयुक्त, कोल्हापूर यांच्यापुढे प्रलंबित आहे. श्री.शेणगावे यांनी सन १९८० ते २००६ या काळातील माहिती मागितली आहे. काही माहिती दिली असून या वादाचा निकाल लागल्यानंतर वादग्रस्त मुद्दयांच्या संदर्भातील माहिती दिली जाईल, असे श्री.शेणगावे यांना कळविण्यात आलेले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री.सदाशिव मल्लय्या स्वामी व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव म्हणून उपस्थित असलेले श्री.अनिल दत्तात्रय आजगेकर यांनी सांगितले. दिलेल्या माहितीच्या व पत्राच्या प्रती त्यांनी सादर केल्या. श्री.शेणगावे सचिवांच्या नावे पत्रे पाठवितात व स्वतःच पोस्टातून परस्पर काढून घेतात, असे निवेदन श्री.आजगेकर यांनी या अनुषंगाने टपाल खात्याकडे केलेल्या तक्रारीच्या प्रतीसह केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे लक्षात घेता संस्थांतर्गत वाद हा या अपिलाच्या संदर्भातील मुख्य विषय असल्याचे दिसून येते. परिणामी संबंधित न्यायासनापुढील निर्णयानंतर माहिती देण्याचा श्री.आजगेकर यांचा देकार रास्त आहे.

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, बहिरेवाडी, ता.आजरा, जि.कोल्हापूर या संस्थे-संदर्भातील वादाबाबत संबंधित न्यायासनाचा निर्णय झाल्यानंतर त्याची प्रत व संस्था स्तरावरील माहिती अपीलकर्त्यास देऊन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री.सदाशिव मल्लय्या स्वामी व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव म्हणून उपस्थित असलेले श्री.अनिल दत्तात्रय आजगेकर यांनी आयोगाला अहवाल सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.५.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रमेश निवृत्ती कांबळे
५४/बीपी/४४१, लोहिया नगर, पुणे-४११०४२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय आयुक्त, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे विभाग, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४६ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रमेश निवृत्ती कांबळे
५४/बीपी/४४१, लोहिया नगर, पुणे-४११०४२

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय आयुक्त, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी श्री.प्रमोद जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्र.१, पुणे विभाग, पुणे श्री.प्रमोद जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्री.छबील कासम पटेल यांच्या जात पडताळणी अर्जावर, दि.१६.१.२००७ रोजी अपीलकर्ता यांनी दिलेल्या अर्जावर विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीचे सचिव, अध्यक्ष यांनी केलेली कार्यवाही, तसेच श्री.छबील कासम पटेल यांनी त्यांच्या जात पडताळणी अर्जासोबत जोडलेली सर्व प्रकारची कागदपत्रे, सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालय यांच्या आदेशांच्या प्रती, जात पडताळणी प्रमाणपत्र किती दिवसात द्यावे याबाबतचे शासन निर्णय. | |

## विवेचन

श्री.छबील कासम पटेल यांच्या व आपल्या स्वत:च्या जात पडताळणीच्या वैधता प्रमाणपत्राबाबत आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्यापातळीवर न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री रमेश निवृत्ती कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

महानगरपालिका निवडणुकीत आपण उमेदवार होतो. निवडणुकीच्या आधीच आपण जात-पडताळणी संबंधाने अर्ज केला होता. त्याबाबत आपल्याला कोणतीही माहिती मिळाली नाही, तसेच श्री.छबील कासम पटेल यांच्या अर्जाबरोबर सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रतीही मिळालेल्या नाहीत, असे प्रतिपादन श्री.कांबळे यांनी दि.१६.७.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व आयोगापुढील सुनावणीत केले. 'निवडणूक आयोग व शासनाकडील तत्कालीन सूचनांप्रमाणे केवळ निवडणूक जिंकलेल्या उमेदवारांचे वैधता प्रमाणपत्र देण्यात आले. केवळ फॉर्म भरलेल्या उमेदवारांच्या अर्जावर अंतिम निर्णय देण्याची कार्यवाही केली नाही. समितीकडे त्यावेळी अतिशय कमी कर्मचारीवर्ग होता, अन्य कार्यालयातील कर्मचाऱ्यांमार्फत काम करुन घेण्यात येत होते. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार होता. कामाची व्याप्ती लक्षात घेऊन शासनाने समित्यांची पुनर्रचना केली आहे,' असे जन माहिती अधिकारी तथा संशोधन

अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात व सुनावणीत नमूद केले. हे स्पष्टीकरण मान्य करण्यात येत आहे. संबंधित कागदपत्रांच्या अनुषंगाने मुद्देनिहाय स्पष्टीकरणात्मक माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास १५ दिवसांत द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. त्यानुसार दि.२९.७.२००८ रोजी श्री.कांबळे यांना माहिती देऊन त्याची प्रत श्री.जाधव यांनी आयोगास सादर केली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि३१.८.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ११५३/ पुणे | श्री.विकास भिमराव गायकवाड मु.पो.वडापुरी, ता.इंदापूर, जि.पुणे | ग्रामसेवक, ग्रामपंचायत वडापुरी, ता.इंदापूर, जि.पुणे | विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती इंदापूर, जि.पुणे | सन २००६ ते २००७ तसेच माहे मे २००७ या कालावधीतील कॅश बुकची छायांकित प्रत या काळात ग्रामसभा किती झाल्या, किती ग्रामस्थ उपस्थित होते, तसेच १२ व्या वित्त आयोगाच्या अनुदानाचा उपयोग कोठे केला इ. माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने दि.२१.१०.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | १२१५/ पुणे | श्री.विकास भिमराव गायकवाड मु.पो.वडापुरी, ता.इंदापूर, जि.पुणे | गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे | गटविकास अधिकारी, पंचायत समिती बारामती, ता.बारामती, जि.पुणे | सन २००५ ते माहे मे २००७ अखेर सर्व शिक्षा अभियाना-अंतर्गत सेतू शाळा, इमारत बांधकाम व इतर खर्चाची माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने दि.२१.१०.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | २५४५/ पुणे | श्री.मकरंद विनायक लोणकर ओंकार, ७७ मनमोहन सोसायटी, | उपअभियंता, पुणे महानगरपालिका बांधकाम नियंत्रण कार्यालय, | उपायुक्त, पुणे महानगरपालिका बांधकाम नियंत्रण कार्यालय, वि.का.क्र.१, | श्री.विजय गदाधर तांबे, रा.प्लॉट नं.२६ मनमोहन सोसायटी, कर्वेनगर, पुणे-२ यांच्या इमारतीवर उभारण्यात आलेल्या | आवश्यक माहिती २० दिवसांत देण्याबाबत दि.२५.०२.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सहवास सोसायटी शेजारी, कर्वेनगर, पुणे-५२ | वि.का.क्र.१, वारजे, कर्वेनगर, पुणे-५२ | वारजे, कर्वेनगर, पुणे-५२ | मोबाईल टॉवर संबंधात झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व संबंधित नस्तीचे अवलोकन करण्यास मिळावे | कार्यक्रमा'तील प्रपत्रात संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे. |
| ४ | ३०४७/ पुणे | श्री.अशोक जनार्दन पंचवाघ बी-४, हर्षल पॅलेस, आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे-५१ | महाव्यवस्थापक, शासकीय दूध योजना, पुणे-३० | प्रादेशिक दुग्धशाळा विकास अधिकारी, कॉमनवेल्थ इमारत, लक्ष्मी रोड, पुणे-३० | निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांकडून वसुली केली किंवा नाही ? नसल्यास कोण जबाबदार ? खात्याचे आदेश काय आहेत ? माझी रु.६५,०००/- एवढी रक्कम आदेश नसताना कशी रोखून ठेवली? याला जबाबदार कोण? | १) कोण जबाबदार? 'खुलासा करा' अशी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत माहिती ठरत नाही. २) अपीलकर्त्यास मूळ अर्जाप्रमाणे माहिती दिलेली असून, अपीलकर्त्याने रु.६५,०००/- सेव्हिंग सर्टिफिकेटस् मुक्त करण्याबाबत आयुक्तांना विनंती केली आहे. यावर अद्याप निर्णय झालेला नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कळविले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) वरील तक्त्यातील एकूण ०४ अपिले अनुक्रमांक १ ते ४ (अपील क्र. ११५३/पुणे, १२१५/पुणे, २५४५/पुणे व ३०४७/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

२) अपील क्रमांक २५४५/पुणे मध्ये निष्कर्षात नमूद केल्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल हा आदेश प्राप्त झाल्यापासून ८ दिवसांत आयोगास सादर करावा. अन्यथा संबंधित जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २० अन्वये शास्ती व तदनुषंगिक अन्य कारवाईस पात्र राहतील.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.** २७-०८-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१६.०७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| १ | अपील क्रमांक | ११८६ / पुणे | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २ | अपीलकर्ता | श्री.विजय नामदेव सोनवणे<br>पंचशीलनगर, कसबा - बारामती,<br>ता.बारामती, जि.पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याधिकारी,<br>बारामती नगरपालिका, ता.बारामती,<br>जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपायुक्त, (नगर पालिका प्रशासन),<br>आयुक्त कार्यालय, कौन्सिल हॉल,<br>पुणे-१ | हजर |

अपीलकर्ता श्री.विजय नामदेव सोनवणे, पंचशीलनगर, कसबा - बारामती, ता.बारामती, जि.पुणे यांनी दि.०७.०५.२००७ रोजीचे अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद बारामती, जि.पुणे यांचेकडे ठराव क्र.९ दि.०३.०५.२००७ ची प्रत, नगरसेवक व मुख्याधिकारी यांनी केलल्या विमान प्रवासाचा तपशील, नगरपालिका कर्मचारी यांचा रुजू आदेश व श्री.भोंडवे व श्री.पाखरे या नगरपालिका कर्मचाऱ्यांबाबतची माहिती मागितलेली होती.

प्रस्तुत विषयातील श्री.पाखरे व श्री.भोंडवे यांच्या संदर्भातील माहिती मागणाऱ्या श्री.सोनवणे यांच्या अपील क्र.७५/पुणे, दिनांक २६.०९.२००७ व अपील क्र.५३५/पुणे,दिनांक ०८.०७.२००८ मध्ये आयोगाने यापूर्वी निर्णय दिलेले आहेत. अपीलकर्ता श्री.सोनवणे वारंवार त्याच त्याच विषयासंबंधी अर्ज करुन माहितीचा अधिकार अधिनियमान्वये प्राप्त अधिकारांचा दुरुपयोग करीत आहेत, असे प्रपत्रातील

निवेदनात जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, बारामती नगरपरिषद यांनी नमूद केले आहे. वारंवार त्याच त्याच विषयांची माहिती मागून शासकीय यंत्रणेचा वेळ व श्रम व्यर्थ घालविणे हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा योग्य वापर नाही, याबाबत अपीलकर्त्यास समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : १८।०८।२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मोरेश्वर गोपाळ अत्रे
द्वारा-श्री.प्रभाकर विनायक खिरे
श्री. मोरेश्वर गोपाळ अत्रे,
श्री. राजाराम बबन घाडगे
श्री. राजू प्रल्हाद राऊत
विद्यानगर, मु.पो.माळेगाव बु., ता.बारामती, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०० / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.७.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. मोरेश्वर गोपाळ अत्रे
द्वारा-श्री.प्रभाकर विनायक खिरे
विद्यानगर, मु.पो.माळेगाव बु., ता.बारामती, जि.पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री.दादाभाऊ जोशी
**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा श्री.कुंभारे
**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली श्री.सांगडे
**जन माहिती अधिकारी** तथा चिटणीस,
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.आवळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.९.२००७, २७.६.२००६ व ३०.९.२००६, ६.७.२००६, ६.७.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.७.२००६, ३०.१२.२००६, २९.८.२००७, २४.७.२००७ |

६ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २० मार्च २००४ च्या परिपत्रकानुसार रोजगार व स्वंयंरोजगार विभागातील जिल्हानिहाय किती अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या याबाबत माहिती.

## विवेचन

अंशकालीन पदवीधर बेरोजगार उमेदवारांच्या नियुक्त्या बाबतची पुणे महसूल विभागातील. सोलापूर, सातारा व कोल्हापूर या जिल्ह्यामधील माहिती मिळाली, परंतु पुणे जिल्ह्यातील माहिती प्रथम मिळाली नाही व नंतर चुकीची मिळाली, अशा कारणावरून श्री. मोरेश्वर गोपाळ अत्रे, श्री. राजाराम बबन घाडगे व श्री. राजू प्रल्हाद राऊत व इतर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. १६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने सुनावणी घेण्यात आली.

श्री. अत्रे व इतर अर्जदारांनी विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे माहिती मागितली होती. त्यांनी विभागातील पाचही जिल्हाधिकाऱ्यांना माहिती देण्याबाबत सूचना देऊन अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला. त्यानुसार पुणे वगळता इतरांकडून माहिती मिळाल्यामुळे त्यांच्या विरूध्द आपली कोणतीही तक्रार नाही, असे श्री. अत्रे यांनी दि. १६.७.२००८ च्या प्रपत्रात नमूद केले. आपण सर्व बेरोजगार पदवीधर अंशकालीन कर्मचारी आहोत, रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे शासन परिपत्रक दि. २०.३.२००४, परिच्छेद क्र. ६ नुसार नियुक्त्या होणे आवश्यक असताना आपल्या नियुक्त्या अद्याप झालेल्या नाहीत, व पुणे जिल्ह्याची त्याबाबतची माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे, असे श्री. अत्रे यांनी लेखी व तोंडी निवेदनाद्वारे नमूद केले. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकारी तथा चिटणीस यांनी दिलेली माहिती खोटी व दिशाभूल करणारी आहे. आपल्याला नियुक्त्या न मिळाल्यामुळे अन्याय होत असून नुकसान होत आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

पुणे वगळता अन्य चारही जिल्ह्यांमधील जिल्हाधिकारी कार्यालयातील जन माहिती अधिकाऱ्यांनी श्री. अत्रे व अन्य अर्जदारांना तत्परतेने माहिती व उत्तरे दिली. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा चिटणीस श्री. दादाभाऊ जोशी यांनी त्या तत्परतेने कार्यवाही केली नाही व स्पष्ट माहिती दिली नाही, याबाबत श्री. जोशी यांना समज देण्यात येत आहे.

दि. १६.७.२००८ रोजी अपीलकर्त्यांनी जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्याकडे उपस्थित राहून प्रत्यक्ष अभिलेखाचे अवलोकन करून माहिती घ्यावी, असे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय घटकांचे चर्चेत ठरले होते. त्यानुसार श्री. अत्रे व इतर यांनी हजर राहून नस्तीची पाहणी केली. अंशकालीन कर्मचाऱ्यांची सामान्य प्रशासन विभागाने मंजूर केलेल्या यादीची प्रत मिळण्याची मागणी श्री. अत्रे यांनी त्यावेळी केली. संबंधित यादी नस्तीमध्ये उपलब्ध नसल्यामुळे अभिलेख कक्षामध्ये शोध घेऊन पुढील आठवड्यामध्ये देण्याचे त्यावेळी ठरले. त्यानुसार श्री. अत्रे व इतर यांनी यादीसह संबंधित

कागदपत्रांची पाहणी केली. आवश्यक छायाप्रती घेण्यास नंतर पुढील आठवड्यात येऊ, असे श्री. अत्रे यांनी सांगितले. परंतु ते न आल्यामुळे दि. ५.८.२००९ रोजी पत्राद्वारे त्यांना तसे कळविण्यात आले, असा अहवाल श्री. अत्रे, श्री. बनकर व श्री. घाडगे यांच्या या विषयीच्या संमतीपत्राच्या प्रतीसह दि. १.९.२००९ रोजी आयोगाला सादर केला. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा चिटणीस, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे श्री. संजीव देशमुख यांनी विहित मुदतीत कार्यवाही केली, मात्र आयोगाला तत्परतेने अहवाल सादर केला नाही. यापुढे अहवाल सादर करण्याबाबत तत्परता राखण्याची जाणीव त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१ .८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सिध्देश्वर दादाराव जाधव
स.नं.६३२/३३, महात्मा फुले पेठ, पुणे ४११००२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष,
विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सदस्य सचिव,
विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,
पुणे विभाग, पुणे, पीएमटी बिल्डिंग, स्वारगेट, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४०+१२६८ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१६.७.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सिध्देश्वर दादाराव जाधव
स.नं.६३२/३३, महात्मा फुले पेठ, पुणे ४११००२

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे प्रतिनिधी श्री.प्रमोद जाधव

**जन माहिती अधिकारी** तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती,
पुणे विभाग, पुणे, पीएमटी बिल्डिंग, स्वारगेट, पुणे-३७ श्री.प्रमोद जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १४.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने श्री.हरिहर याना जात पडताळणीची दोन प्रमाणपत्रे दिलेली आहेत यापैकी कोणते प्रमाणपत्र सत्य आहे किंवा दोन्ही खोटी प्रमाणपत्रे आहेत काय. | |

## विवेचन

महानगरपालिका निवडणुकीत श्री.विष्णू नारायण हरीहर यांना जात प्रमाणपत्र देण्यात आले होते काय? या अनुषंगाने मागितलेली माहिती व त्यांना दिलेल्या दोन वैधता प्रमाणपत्रातील सहीत फरक असल्यामुळे ही पत्रके खरी की खोटी, याची माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर समाधानकारक न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.सिध्देश्वर दादाराव जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.१६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सदर अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

श्री.हरीहर यांनाच फक्त दोन जात प्रमाणपत्रे देण्यात आलेली आहेत. पुणे विभागातील पाच जिल्ह्यातील इतर कोणालाही प्रमाणत्र देण्यात आलेले नाही, याचा तपशील व दोन प्रमाणपत्रे खरी की खोटी ती तपासून मिळावी, अशी मागणी श्री.जाधव यांनी केली. मूळ प्रमाणपत्रे संबंधित व्यक्तीला दिली असल्यामुळे ती खरी की खोटी हे माहितीच्या अधिकारात तपासून देणे शक्य नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी श्री.प्रमोद जाधव यांनी केले.

निवडणूकविषयक तत्कालीन नियमाप्रमाणे निवडून आलेल्या उमेदवारांना वैधता प्रमाणपत्र देण्यात आले. त्या काळात समितीकडे पुरेसा कर्मचारीवर्ग नसल्यामुळे अन्य कार्यालयातील

कर्मचाऱ्यांकडून काम करुन घेण्यात येत होते. जन माहिती अधिकाऱ्यांकडेही संशोधन अधिकारी या पदाचा कार्यभार होता. कामाच्या व्याप्तीमुळे समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे, प्रमाणपत्राच्या संदर्भातील कागदपत्रे अन्य समितीकडे हस्तांतर झालेली आहेत, असे श्री.प्रमोद जाधव यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

मूळ मागणी संदर्भातील वस्तुस्थिती अपीलकर्त्यास १५ दिवसात कळवावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी वैधता प्रमाणपत्राकरिता प्राप्त झालेल्या उमेदवारांची / अर्जदारांची नावे व त्यांना देण्यात आलेल्या प्रमाणपत्रांच्या क्रमांकाची नोंद असणाऱ्या रजिस्टरच्या १०७ पानांच्या छायांकित प्रती श्री.प्रमोद जाधव यांनी अपीलकर्त्यास पाठविल्या. तसेच 'श्री.विष्णू नारायण हरीहर याना ८८४५३ अशा क्रमांकाची दोन्ही प्रमाणपत्रावर वेगवेगळ्या सह्या असल्याबाबत माहिती मागितली होती. काही अधिकारी हे प्रमाणपत्रांच्या मूळ प्रतीवर पूर्ण स्वाक्षरी करतात व प्रमाणपत्रांच्या स्थळप्रतीवर / कार्यालयीन प्रतीवर छोटी स्वाक्षरी करतात. त्यामुळे सह्यांमध्ये तफावत असल्याचे जाणवत असावे. मात्र सदर प्रमाणपत्रांच्या स्थळप्रतीचा / कार्यालयीन प्रतीचा कार्यालयीन कर्मचाऱ्यांमार्फत शोध घेतला असता सदर प्रमाणपत्र अद्यापपर्यंत आढळले नाही,' असे दि.२९.७.२००८ च्या निवेदनान्वये श्री.जाधव यांनी आयोगाला कळविले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३१.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र भाऊसाहेब कुदळे
सहजीवन हौसिंग सोसायटी, प्लॉट आरएम-४, ब्लॉक-बी-४,
एमआयडीसी-जी-ब्लॉक, केएसबी चौक, हॉटेल भोलासमोर,
लोहाडे हॉस्पिटलजवळ, शाहूनगर, चिंचवड, पुणे-१९ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार,
जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४८ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | १६.७.२००८ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.रामचंद्र भाऊसाहेब कुदळे
सहजीवन हौसिंग सोसायटी, प्लॉट आरएम-४, ब्लॉक-बी-४,
एमआयडीसी-जी-ब्लॉक, केएसबी चौक, हॉटेल भोलासमोर,
लोहाडे हॉस्पिटलजवळ, शाहूनगर, चिंचवड, पुणे-१९

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे श्री.संभाजी चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.११.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १८.१२.२००६ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे राजेगाव, ता.दौंड, जि.पुणे येथे श्री.भाऊ मस्कू कुदळे व चंदर मस्कू कुदळे यांना धरणग्रस्त म्हणून वाटप केलेल्या जमिनीची कागदपत्रे मिळण्याबाबत.
(आदेश ताबापावती, पंचनामा इ.)

## विवेचन

धरणग्रस्त म्हणून वाटप झालेल्या शेतजमिनीची ताबे पावती, पंचनामा, नकाशा आदी पाच कागदपत्रांची मागणी आपण केली होती. त्यापैकी तीन कागदपत्रांची माहिती मिळाली व ऊर्वरित उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर कळविण्यात आले. जमिनीच्या मालकी हक्कापोटी शासनाकडे भरावयाच्या रकमेचा तपशील, ७/१२ वरील नवीन पुनर्वसन शर्त ही अट कमी करून मिळण्यासाठी करावयाच्या पूर्ततेचा तपशील आदी माहिती मिळावी व मुख्यत: नवीन शर्त कमी करून मिळावी, या मागणीसाठी अपीलकर्ता श्री. रामचंद्र भाऊसो कुदळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. १६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

ताबे पावती आदी कागदपत्रे आपल्याकडे नसल्यामुळे आपण त्यांची मागणी करीत आहोत, असे प्रतिपादन श्री. कुदळे यांनी केले. ताबे पावती व पंचनामा या कागदपत्रांचा शोध घेऊनही ती न आढळल्यामुळे तसे कळविले व अन्य कागदपत्रांच्या प्रती दिल्या. ताबे पावतीचा शोध अजूनही घेतला जात आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे श्री. संभाजी चव्हाण यांनी नमूद केले.

नवीन शर्त कमी करून मिळावी, ही अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत ती येत नाही. तरीही 'नवीन शर्त कमी करण्याबाबत आवश्यक ते सहकार्य श्री. कुदळे यांना करण्यात येईल,' असे अपिलीय प्राधिकारी श्री. चव्हाण यांनी सांगितले. श्री. कुदळे यांना नवीन शर्त कमी करण्याबाबतचा फॉर्म दिला असून आवश्यक कागदपत्रांसह त्यांनी तो सादर केल्यानंतर ३० दिवसांत निर्णय घेतला जाईल, व हा अर्ज दाखल केल्यावर १५ दिवसात कब्जेहक्काची रक्कम कळविली जाईल, असे त्यांनी लेखी व तोंडी नमूद केले. त्यानुसार श्री. कुदळे यांनी दि. २८.७.२००८ रोजी नवीन शर्त कमी करण्याबाबतचा अर्ज केल्यानंतर दि. १०.११.२००८ रोजी कब्जेहक्काची रक्कम जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे यांनी श्री. कुदळे यांना कळविली व ७/१२ च्या इतर हक्कातील 'नवीन व अविभाज्य शर्तीवर प्रदान' असा शेरा कमी करण्याचा आदेश जिल्हाधिकारी तथा उपसंचालक पुनर्वसन (जमिन), पुणे श्री. चंद्रकांत दळवी यांनी दि. ३०.८.२००८ रोजी दिला. माहितीच्या अधिकारातील माहिती मागण्यामधील

अपीलकर्त्याचा प्रशासकीय कार्यवाहीची गरज असलेला मूळ प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हा पुनर्वसन अधिकारी श्री. संभाजी चव्हाण व उपसंचालक पुनर्वसन (जमिन), पुणे श्री. चंद्रकांत दळवी यांनी केलेली कार्यवाही प्रसशंनीय आहे, आयोग त्याची नोंद घेत आहे.

जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे यांनी कबूल केल्याप्रमाणे आपल्याला कब्जेहक्काची रक्कम कळविली, नवीन शर्त कमी करण्याचा आदेश झाला. मात्र दुरूस्त ७/१२ व फेरफार मिळाला नाही, अशी तक्रार श्री. कुदळे यांनी दि. २५.३.२००९ रोजी या निवेदनाद्वारे आयोगाला केली. परंतु हा विषय मूळ प्रश्नातील प्रशासकीय कार्यवाहीशी संबंधित असून माहितीच्या अधिकारात अशा बाबींची अतिरिक्त मागणी विचारात घेता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१ .८.२००९**